# हायटेंशन लाईन भूमिगत करा!

## पूर्व नागपुरातील नागरिकांचे आयुक्तांना निवेदन

**नागपूर,ता. १४ :** हायटेंशन लाईनखालील घरे तोडण्यासंदर्भात मनपाने सुरू केलेल्या कारवाईसंदर्भात पूर्व नागपुरातील गाडगेनगर, चिटणीस नगर, रतननगर, डायमंड नगर, मयूरपेठ, रामकृष्णनगर आदी भागातील नागरिकांनी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांना भेटून निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, मनपाच्या कारवाईमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. अनेक नागरिकांना हायटेंशन लाईनखालील घरे तोडण्यासंदर्भात नोटीस प्राप्त झाली आहेत. सर्वच लोकांनी घामाचा पैसा खर्च करून घरे बांधली आहेत. ही घरे राहावीत, यासाठी मनपा आयुक्तांनी स्वत: पुढाकार घ्यावा. मनपाद्वारे तात्काळ भूमिगत लाईन करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे. यासंदर्भात आयुक्त अभिजीत बांगर यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. जलप्रदाय समितीचे सभापती तथा प्रभाग क्र. २८ चे नगरसेवक पिंटू झलके, विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे, ज्येष्ठ नगरसेवक प्रफुल्ल गुडधे, नगरसेवक रमेश पुणेकर यांच्या नेतृत्वातील या शिष्टमंडळात परमेश्वर राऊत, राम आचार्य, ऋषिकेश डांगाले, अनिल बारई, लक्ष्मीकांत सावरकर, अमोल पन्नासे, शेख रसूल, गजानन कामळे, अनिल तीनपत्रे, दिगांबर भोयर, नंदाताई भोयर, शंकर चिमणकर, दामोधर वानखेडे, संतोष श्रीवासत्रत आदींचा समावेश होता.